N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

Pune City Road Police Station

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** सिंहगड रोड पोलीस स्टेशन

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0085 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**06/02/2025 15:37

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 3 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 3(5) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 05/02/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 05/02/2025
**Time From (वेळेपासून):** 07:02 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:18 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 05/02/2025 **Time (वेळ):** 15:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 021
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/02/2025 15:37 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
ईशान्य, 3.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** अतुल्य हॉटेल, नांदेड सिटी,सिंहगड रोड येथील पार्कींगमध्ये

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

ये.



6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** योगेश शिवाजी आव्हाड

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** शिवाजी आव्हाड

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सनं 41/42, तनिष्क निवास, ,साई संस्कती सोसायटी, अंबाईदरा,धारेश्वर मंदिरामागे धायरी, ,पुणे ,सिंहगड रोड पोलीस स्टेशन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सनं 41/42, तनिष्क निवास, ,साई संस्कती सोसायटी, अंबाईदरा,धारेश्वर मंदिरामागे धायरी, ,पुणे ,सिंहगड रोड पोलीस स्टेशन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** बांधकाम व्यावसायिक

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8888881388

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री नथुराम कोंडीबा डोईफोडे | | वडील का नाम : कोंडीबा डोईफोडे | 1. सर्वे नं77/2/1,,रायकरमळा, धायरी गाव, पुणे,सिंहगड रोड पोलीस स्टेशन,पुणे शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री.बाळासाहेब धाऊ मरगळे | | वडील का नाम : धाऊ मरगळे | 1. सर्वे नं160, किरकटवाडी, ,ता हवेली, जिल्हा पुणे ,सिंहगड रोड पोलीस स्टेशन,पुणे शहर, महाराष्ट्र,भारत |

ये. का.
शा. नि
G.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - 1)

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)** (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

गु.रजि.नं. व कलम-85/2025, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 कलम 7-अ, 12 व भारतीय न्याय संहिता कलम 3(5) प्रमाणे फिर्यादी जबाब तारीख 06/02/2025

माझे नाव योगेश शिवाजी आव्हाड, वय 40 वर्षे, धंदा कॉन्ट्रॅक्टर, रा. स.नं. 41/42, तनिष्क निवास, साई संस्कृती सोसायटी, अंबाईदरा, धारेश्वर मंदिरामागे धायरी, पुणे, 41, मोबाईल नंबर 8888881388. yogesh.avhad9999@gmail.com

समक्ष हजर राहून फिर्यादी जबाब देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहण्यास आहे. मी 2024 मध्ये मौजे वडघर, ता. वेल्हा, जि. पुणे येथे मालमत्ता क्र. 26 व खुली जागा पडीक घरासह लांबी 32 बाय 27 फुट ही संपुर्ण मिळकत दि. 02/01/2024 रोजी श्रीप्रसाद चौंडी यांच्याकडून खरेदीखत करून खरेदी केलेली आहे. त्याबाबत दुय्यम निबंधक कार्यालय, वेल्हा येथे दस्त क्र. 26/2024 नुसार नोंदणी झालेली आहे. सदर मालमत्तेवर माझे नाव लागून ग्रामपंचायत 8 अ चा उतारा मिळण्याकरीता मी वडघर ग्रामपंचायत कार्यालय येथे दिनांक 01/02/2025 रोजी अर्ज दिला आहे. 8 अ उता-यासाठी ग्रामपंचायतचा ठराव आवश्यक असल्यामुळे व तो ठराव सरपंच मांडत असल्यामुळे मी दिनांक 04/02/2025 रोजी वडघर ग्रामपंचायत येथील सरपंच श्रीमती सुवर्णा नथुराम डोईफोडे यांना भेटलो त्यावेळी त्यांचे पती नथुराम डोईफोडे हे त्या ठिकाणी हजर होते. त्या दोघांनी मला 8 अ च्या उता-यावरील जुन्या मालकाचे नाव कमी करून माझे नाव उता-यावर घेण्याकरीता तसा ठराव ग्रामपंचायत मिटींगमध्ये घेण्यासाठी 18,000/- (अठरा हजार रूपये) मागणी केली आहे. मला मागणी करीत असलेली रू. 18,000/- रक्कम ही कोणतीही शासकीय फी नसून ती लाच रक्कम असलेबाबत माझी खात्री झाली. तरी मला सरपंच व त्यांचे पती यांना रू. 18,000/- लाच देण्याची इच्छा नसल्याने तसेच मी त्यांना लाचेची रक्कम दिली नाही तर ते माझे 8 अ चे उता-यावरील जुन्या मालकाचे नाव कमी करून माझे नाव उता-यावर घेण्याकरीता तसा ठराव ग्रामपंचायतीच्या मिटींगमध्ये घेणार नाहीत अशी माझी खात्री झाल्याने सरपंच व त्यांचे पती यांचेवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत योग्य ती कायदेशीर कार्यवाही होण्याकरीता मी दिनांक 04/02/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे येऊन लेखी तक्रार दिली होती.

मी दिलेल्या तक्रारीचे अनुशंगाने दिनांक 05/02/2025 रोजी वरघड ग्रामपंचायत संरपंच श्रीमती सुवर्णा नथुराम डोईफोडे व त्यांचे पती श्री नथुराम डोईफोडे यांची माझ्याकडे लाचेची मागणी आहे अगर कसे याबाबत पडताळणी करण्याचे ठरवुन पोलीस निरीक्षक श्री वाघमोरे यांनी लोकसेवक वरघड ग्रामपंचायत सरपंच श्रीमती सुवर्णा नथुराम डोईफोडे व त्यांचे पती श्री नथुराम डोईफोडे यांच्याकडे पडताळणी कामी माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देऊन पंच श्री दत्तात्रय सुखराज कोळगे याचेसह पाठविले असता मी श्री नथुराम डोईफोडे यांची त्यांच्या राहत्या घराचेजवळ भेट घेतली व त्यावेळी आमच्यामध्ये कामाचे संदर्भात बोलणी झाली. नथुराम डोईफोडे हे मला म्हणाले की, कालच काय ते आपली चर्चा झाली, ते नका सांगू, बाळासाहेबांना भेटा, काय असन ते देवून टाका त्यावेळी मी त्यांना म्हणालो नाय पण, तुम्ही मला सांगा ना. त्यावेळी श्री नथुराम डोईफोडे हे मला म्हणाले की, तुम्ही

किती करता ओ. त्यावर मी त्यांना म्हणालो, नाय तस नाय तुम्ही सांगा तस नाय तुम्ही सांगा त्यावर ते मला म्हणाले किती, किती. मी त्यांना सांगीतले मला अठरा म्हणालेत, त्यावर मी त्यांना म्हणालो तुम्ही काय सांगा किती करायचे काय ? तेव्हा ते मला किती ही द्या असे म्हणाले. त्यानंतर श्री डोईफोडे हे मला म्हणाले ऐका ना, तुम्हाला काय वाटतय तस करुन टाका, काय विषय नाय, त्यावर मग मी त्यांना पंधरा हजार करु का ? ऐका ना पंधरा हजार असे म्हणालो असता त्यांनी मान हलवुन नकारार्थी इशारा केला असता मी त्यांना त्यावेळी सोळा हजार देतो ना काय अडचण आहे, त्यावेळी त्यांनी मानेने होकार देऊन चालतय असे म्हणून रु. 16,000/- लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना मी दिलेल्या अर्जावर सरपंच ताई यांची सही देण्याकरीता विनंती केली असता त्यांनी त्यांच्या घरी जावुन सरपंच ताईंची सही केलेला पेपर मला आणुन दिला. त्यानंतर मी त्यांना माझे काम लवकर करण्याकरीता सांगितले असता, त्यांनी मला बघतो एक दोन दिवसात करतो असे सांगितले. त्यानंतर मी त्यांना पैसे कोणाकडे दयायचे असे बोलले असता त्यांनी बाळा मरगळे यांचेकडे पैसे दया असे सांगितले. त्यावर मी हो चालेल असे म्हणुन निघुन आलो. त्यानंतर नथुराम डोईफोडे यांच्या सांगण्यावरुन मी श्री बाळा मरगळे यांना माझे मोबाईल वरुन फोन केला असता बाळा मरगळे यांनी मला नांदेड सिटी, सिंहगड रोड येथील अतुल्य हॉटेल येथे येण्यास सांगितले.

सदर पडताळणी दरम्यान सरपंच वडघर श्रीमती सुवर्णा डोईफोडे यांचे पती श्री नथुराम डोईफोडे यांनी माझ्याकडे 16000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने व सदरची रक्कम श्री बाळा मरगळे यांचेकडे देण्याबाबत सांगितल्याने दोन पंचासमक्ष मला लाच रक्कम हजर करण्यास सांगीतले असता मी सदरची रक्कम माझे इंडसन्ट बँकेच्या बचत खात्यातुन धायरी गाव येथील एच.डी.एफ.सी बँकेच्या ए.टी.एम. मधुन काढुन 16,000/- रुपये हजर केले. त्या नोटांचे नंबर एका कागदावर लिहुन त्या नोटांना अँन्थ्रॉसिन पावडर लावुन अँन्थ्रॉसिन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगुन व त्याबाबतचे प्रात्यक्षिक समजावुन सांगुन व त्याबाबतचे प्रात्यक्षिक करुन दाखवुन माझ्या पॅन्टचे मागील बाजुचे डाव्या खिशामध्ये ठेवल्या. त्यानंतर मला, सापळा पथक, पंच क्र. 1 व 2 यांना पोलीस निरीक्षक वाघमोरे यांनी सापळा कारवाईच्या योग्य त्या सुचना देऊन माझ्याकडे रेकॉर्डर चालु करुन देऊन मला आणि पंच नं.1 यांना माझे चारचाकी कार क्र. एम.एच.14 बी.एक्स.0011 यामधुन अतुल्य हॉटेल, नांदेड सिटी, सिंहगड रोड येथे बाळा मरगळे यांना लाचेची रक्कम देण्याकरीता रवाना केले पो.नि.श्री. वाघमोरे यांनी मला लाच स्विकारल्यानंतर मोबाईल फोन करण्याचा पुर्वनियोजीत इशारा करण्यास सांगितले होते व आमचे पाठोपाठ सापळा पथक व पंच क्र.2 असे त्यांचेकडील वाहनाने अतुल्य हॉटेलच्या समोरील रोडचे बाजुला कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने विखरुन थांबले. त्यानंतर मी अतुल्य हॉटेलच्या पार्कीगमध्ये कार पार्क करत असताना मला सदर पार्कीगमध्ये माझ्या ओळखीचे शिवाजी मरगळे हे उभे असल्याचे दिसले. त्यावर मी त्यांना इशारा करुन माझे गाडीत बसण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही चर्चा करीत असताना त्या ठिकाणी बाळा मरगळे आले ते कारमध्ये बसले. थोडया वेळाने श्री नथुराम डोईफोडे हे आम्ही सर्वजन बसलेल्या माझ्या कारजवळ आले. त्यावेळी मी त्यांना कारमध्ये बसण्याबाबत ईशारा केला. त्यानंतर आम्ही सर्वजन कारमध्ये बसलो असता आमचेत माझ्या कामाविषयी चर्चा झाली. सदर चर्चेदरम्यान मी नथुराम डोईफोडे यांना माझ्या कामाबाबत विचारले असता त्यावेळी त्यांनी मला बुधवारपर्यत करुन देतो असे सांगितले. त्यावर बाळा मरगळे हे नथुराम डोईफोडे यांना म्हणाले की एवढे पैसे देतायत तर दया की करुन सोमवार पर्यत त्यावर नथुराम डोईफोडे हे बुधवार संध्याकाळपर्यत करुन देतो असे म्हणाले. त्यानंतर मी बाळा मरगळे यांना म्हणालो की, आज नथुरामनी शब्दाला मान देवुन दोन हजार त्यांनी केले, इतक्या दिवस करत होता का असे म्हणालो असता, ते म्हणाले किती कमी केले? तेव्हा मी त्यांना दोन हजार रुपये कमी केले असे सांगितले त्यावेळी चांगल झाल उलट असे ते म्हणाले. त्यानंतर मी माझे पॅन्टच्या मागील बाजुच्या डाव्या खिशातील लाच रक्कम काढुन बाळा मरगळे व नथुराम डोईफोडे यांचे समोर धरली असता, नथुराम डोईफोडे यांनी ते त्यांच्याकडेच असे म्हणून लाच रक्कम बाळा मरगळे यांचेकडे देण्यास सांगितली. त्यावर बाळा मरगळे यांनी नथुराम डोईफोडे यांना नाय नाय घ्या तुमच्याकडे असे म्हणाले त्यावर मी म्हणालो की, घ्या आता सगळे एकत्रच ए, मोजुन घ्या भाऊ असे म्हणून मी लाच रक्कम नथुराम डोईफोडे यांचेकडे दिली. त्यावर मरगळे हे डोईफोडे यांना म्हणाले की, मोजा तुम्हीच त्यावेळी डोईफोडे यांनी लाच रक्कम स्विकारुन ती मोजुन त्यांचे पॅन्टचे मागील बाजुचे डाव्या खिशामध्ये ठेवुन दिली. त्यानंतर मी डोईफोडे यांना बोललो की, सरपंच ताईना माझ्यासाठी फोन करुन एक शब्द सांगा की, झालय म्हणुन नाहीतर त्या परत आडव येतील. त्यावर ते मला म्हणाले की, अहो मी आहे ना, एवढ तुम्ही कायय, तेव्हा मी त्यांना सरपंच ताईंना फोन करण्यास सांगितले तेव्हा त्यांनी मला तिचा मोबाईल माझ्याकडय ती दवाखान्यातय असे सांगितले. त्यानंतर मी त्यांना ताई आडवे काही करणार नाही ना असे विचारले असता त्यांनी मला अहो सही करतील त्या, काहीच नका ओ लोड घेऊ असे म्हणाले.

त्यानंतर काही वेळाने मी ठरल्याप्रमाणे पो.नि.श्री वाघमोरे यांच्या मोबाईल क्रमांकावर फोन करुन अरे कुठ

Road Police Station Pune City

गेलय या असे म्हणून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यानंतर पोलीस निरीक्षक वाघमोरे व सापळा पथक आम्ही बसलेल्या कारजवळ आले व सापळा पथकाने माझ्यासोबत कारमध्ये बसलेल्या श्री नथुराम डोईफोडे, श्री बाळा मरगळे यांना ताब्यात घेऊन डोईफोडे यांच्याकडील लाच रक्कम ताब्यात घेतली ती वेळ 13.18 वा.चे सुमारास होती. त्याबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी दि.05/02/2025 रोजी सकाळी 07/02 ते 13/18 वा.चे दरम्यान करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई वरुन अतुल्य हॉटेल, नांदेड सिटी, सिंहगड रोड येथील पार्कींगमध्ये करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान माझे मौजे वडघर, तालुका वेल्हा, जि.पुणे येथील मालमत्ता क्र.26 पडसर व खुली जागा व पडिक घर मालमत्ता ही माझ्या नावावर होऊन ग्रामपंचायत 8 अ चा उता-यावरील जुन्या मालकाचे नाव कमी करुन माझे नाव उता-यावर घेण्याकरीता तसा ठराव ग्रामपंचायतीच्या मिटींगमध्ये घेण्यासाठी वडघर ग्रामपंचायत येथील संरपंच श्रीमती सुवर्णा नथुराम डोईफोडे यांचे पती श्री नथुराम कोंडीबा डोईफोडे वय 32 वर्षे, व्यवसाय- नोकरी रा.सर्वे नं. 77/2/1, रायकरमळा, धायरी गाव, पुणे यांनी रुपये 16,000/- रुपयांची लाचेची मागणी करुन सरपंच श्रीमती सुवर्णा नथुराम डोईफोडे यांच्याकरीता नथुराम डोईफोडे व बाळासाहेब मरगळे, वय -33 वर्षे, व्यवसाय -शेती, रा. सर्वे नं.160, किरकटवाडी, ता.हवेली, जिल्हा पुणे. मुळ रा. मु.गिवशी, पोष्ट- शिरकोली, ता.वेल्हा, जिल्हा पुणे यांनी संगणमत करून लाच स्विकारण्यास येऊन लाच स्विकारण्याची तयारी दाखवून नथुराम डोईफोडे यांनी लाच रक्कम रू. 16,000/- स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. तसेच श्री नथुराम कोंडीबा डोईफोडे व श्री.बाळासाहेब धाऊ मरगळे यांनी लाच स्विकारण्यास एकमेकांना प्रोत्साहन दिले आहे म्हणुन माझी त्या दोघांविरुध्द फिर्याद आहे. अन्वेषण अधिकारी-श्री प्रेम वाघमोरे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

dilip pandurang daingade(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

F.I.R प्रत मिळाली.

Signature of Officer in charge, Police Station, पोलीस ठाणे
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): dilip pandurang dair
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.):